सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# शासकीय तंत्रनिकेतन, धाराशिव
## तुळजापूर रोड, धाराशिव ४१३५०१.

Email IDI: principal.gposmanabad@dtemaharashtra.gov.in
office.gposmanabad@dtemaharashtra.gov.in,
Webside-www.gposmanabad.org DTE Code:2018, MSBTE Code:0118

जा.क्र.शातंधा/आस्था-१/२०२६/ 654 दिनांक. 17 MAR 2026

**परिपत्रक**:-

संदर्भ :- मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई यांचे परिपत्रक क्रमांकः
४-४अ/आस्था/कॅस/२०२६/७५ दि.२८-०२-२०२६.

उपरोक्त संदर्भान्वये सुचित करण्यात येते कि, **अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या अधिसुचना/मार्गदर्शक सूचना व इतर संबंधित संदर्भातील तरतुदी पुर्ण करणा-या पात्र अध्यापकांना Career Advancement Scheme (CAS) अंतर्गत लाभ मिळण्यासाठी** दिनांक ०६ मार्च २०२६ ते दिनांक ३० मार्च २०२६ या कालावधीत https://emis.dtemaharashtra.gov.in या लिंकवर लॉग-इन करून त्यांची माहिती तसेच संबंधित प्रमाणपत्रे/कागदपत्रांच्या मूळ प्रतींच्या प्रतिमा (स्कॅन प्रती) अपलोड कराव्यात. संगणकीय प्रणालीवरील युजर मॅन्युअल मधील सूचनांनूसार व विहित टप्प्यांप्रमाणे लॉग-इन करून माहिती व कागदपत्रे अपलोड करणे आवश्यक राहील. संगणकीय प्रणालीवर माहिती भरताना उपलब्ध सेवाभिलेखाच्या आधारेच माहिती भरण्यात यावी. संबंधीत अध्यापकांनी ऑनलाईन प्रणालीमध्ये सर्व आवश्यक माहिती भरून संबंधीत कागदपत्रे अपलोड केल्यानंतर, माहिती व कागदपत्रे सत्य व अचुक असल्याबाबतच्या घोषणापत्रातील "मान्य/स्वीकृत (✓)" या पर्यायाची केलेली निवड ही संबंधीत अध्यापक यांचे हमीपत्र (Undertaking) समजण्यात येईल. सदर घोषणेनंतर माहिती अथवा कागदपत्रांमध्ये कोणतीही त्रुटी किंवा चुकीची नोंद आढळलयास त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत अध्यापक यांच्यावर राहील व त्यांचेविरूद्ध शासन नियमांनुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

येथे असेही नमुद करण्यात येते कि, जे अध्यापक सेवानिवृत्त अथवा स्वेच्छानिवृत्त झालेले आहेत, त्यांनी ऑनलाईन प्रणालीवर देण्यात आलेल्या सुचनेनुसार युजर आयडी निर्माण करण्यासाठी आवश्यक ती माहिती भरावी. या भरलेल्या माहितीची अधिकृतता प्राचार्यांनी "मान्य" केल्यानंतरच संबंधीत अध्यापकांना ऑनलाईन पद्धतीने पुढील माहिती भरण्याची परवानगी देण्यात येईल. त्यानुसार, संबंधीत अध्यापकांनी युजर मॅन्युअलमध्ये नमूद केलेल्या सुचनांप्रमाणे आवश्यक ती सर्व माहिती व प्रमाणपत्रे ऑनलाईन प्रणालीवर अपलोड करण्याची कार्यवाही विहीत कालावधीत पुर्ण करावी.

(डॉ.एम.आर.लोहोकरे,)
प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन,धाराशिव.

प्रत- १) **सर्व विभाग प्रमुखांना** माहीतीस्तव देवून कळविण्यात येते कि, आपल्या अधिनीस्त पात्र असणा-या अध्यापकांना सदर परिपत्रकाबाबत **अवगत करावे.**

२) **या संस्थेच्या प्रोग्रामर** यांना प्रत देवून कळविण्यात येते कि, सदर परीपत्रक संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावे.